# <u>नियमित दिवाणी दावा क्र.३४/२०२० निशाणी क्र.५ खालील आदेश</u>
## (**<u>CNR No.MHNS160005252020</u>**)

०१. प्रस्तुतच्या अर्जान्वये वादी यांनी अशी तुर्तातुर्त विनंती केली आहे की, दावा मिळकतीमध्ये वादी यांची असलेली शांततामय कब्जेवहिवाटीस तसेच गट क्र.३०० मध्ये चोरदडी धरणावरुन आणलेल्या पाईपलाईनचा वापर करण्यास प्रतिवादींनी कोणत्याही प्रकारे हरकत, अडथळा करु नये व तसेच सदर चोरदडी धरणावरुन आणलेल्या पाईपलाईनचा वापर हा नियमित दावा क्र.४३/२००२ चे नि.क्र.८२ चे हुकूमनामाप्रमाणेच करावा व तसेच सदर पाईपलाईनचे पाणी प्रतिवादी क्र.३ वसंत यांनी कोणत्याही कारणासाठी वापरु नये.

०२. प्रतिवादी यांचे विरुध्द विना कैफियत/जबाब चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

०३. वादी यांचे विधीज्ञ यांचा युक्तिवाद श्रवण केला. प्रतिवादींतर्फे युक्तिवाद केला नाही.

०४. वादी यांची कथने व दप्तरी दाखल असलेल्या दस्तऐवजांवरुन खालील मुद्दे विचारार्थ आले, त्यावर पुढील कारणमिमांसेसह विवेचन करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी असे सिध्द करतात काय की, त्यांना प्रथमदर्शनी वाद आहे ? | होकारार्थी. |
| २. | वादी असे सिध्द करतात काय की, सोईचे संतुलन त्यांच्या हक्कात आहे ? | होकारार्थी. |
| ३. | वादी असे सिध्द करतात काय की, अर्ज नामंजूर झाल्यास त्यांचे अनिरसनीय असे नुकसान होईल? | होकारार्थी. |
| ४. | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |

:: <u>का र ण मि मां सा</u> ::

<u>मुद्दे क्र.१ ते ४</u> **:-**

०५. मुद्या क्र.१ ते ४ हे एकमेकांशी निगडीत असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व मुद्दे एकत्रीत चर्चेसाठी घेतले आहेत. तसेच, वादी यांच्या दाव्यातील व कैफियतमधील कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यक तेवढीच कथने कथीत केली आहेत.

०६. प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठराव व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकत गट क्र.३०० पैकी वादी यांच्या नावे असलेली पुर्व बाजुकडील असलेले एकुण ९० आर क्षेत्र वादी यांच्या मालकीचे असुन व चोरदडी धरणावरुन आणलेल्या पाईपलाईनने पाणी वापरासाठी १/३ इतका हक्क आहे. तसेच, नि.दि.दा.क्र.४३/२००२ मध्ये नि.क्र.८१ येथे झालेल्या समजुतीप्रमाणे आणि नि.क्र.८२ येथील दि.१९.१२.२००७ रोजीच्या हुकूमनामाप्रमाणे वादी यांच्या हिश्यास गट क्र.३०० पैकी २हे१०आर अशी मिळकत विदयुत मोटारीने पाणी घेण्याच्या व गावठाणाच्या निम्या हिश्याच्या हक्कासह व त्यातील बोअरवेलचे विदुयत मोटारीने निम्म्या हिश्याने पाणी घेण्याचे हक्कासह व त्या निम्म्या हिश्याच्या राहत्या घरासह वादी यांना सामाईकात १/३ हक्क दिलेला आहे व सदर नि.क्र.८१ येथील समजुतीप्रमाणे वादी हे दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीत आहेत. सदर समजुतीप्रमाणे दावा मिळकतीचे फेरफार मंजुर झालेले आहेत. असे असतांना, वादी यांनी दि.२१.०९.२०११ रोजी नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र.२९००/२०११ प्रमाणे प्रतिवादी यांना गट क्र.३०० पैकी सामाईकात १० आर क्षेत्र, विहीर, विदुयत मोटार, बोअरवेल दिलेले आहे. येणेप्रमाणे वादी यांना दावा मिळकतीमधील पुर्वेकडील २हे१०आर क्षेत्र व चोरदडी धरणावरुन आणलेल्या पाईपलाईनने पाणी वापरण्यासाठीचा हक्क शिल्लक राहिलेला आहे.

०७. वादी पुढे कथन करतात की, त्यानंतर वादी व त्यांची पत्नी यांचेत फौ.चौ.अर्ज क्र.१७०/२०१७ मधील समजुतीप्रमाणे सदर २हे१०आर क्षेत्रापैकी उत्तर-दक्षिण बांध टाकुन पश्चिमेकडील १हे२०आर क्षेत्र घरासह वादी यांची पत्नी वंदना यांचे नावे कायमस्वरुपी करुन देण्याचे ठरले होते व सदर समजुतीप्रमाणे सातबारा सदरी फेरफार क्र.१२४० हा प्रमाणित झालेला आहे व तसेच दावा मिळकतीपैकी पुर्व बाजुकडील ९० आर क्षेत्र व सदर पाईपलाईनचा १/३ हक्काचे वादी मालक आहेत. वर

कथन केल्याप्रमाणे त्यांची पत्नी सदर क्षेत्राची मालक आहेत त्या क्षेत्राशी प्रतिवादींचा कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध नाही.

०८. वादी पुढे असे कथन करतात की, सदर समजुतीप्रमाणे ठरलेल्या वाराप्रमाणे वादी व प्रतिवादी हे सदर पाईपलाईनचे पाणी वापरत असतांना प्रतिवादी हे दि.१७.०२.२०२० पासुन वादी यांना ते सदर पाईपलाईनचा वापर करु देत नसुन त्रयस्थ व्यक्ती यांना सदर पाईपलाईनचे पाणी प्रतिवादी यांनी देण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे, वादी यांना न्यायालयामार्फत झालेल्या वाटपाप्रमाणे पाईपलाईनचे पाण्याचा वापर करण्यापासुन वंचित रहावे लागत आहे व वादी यांचे अपरिमित असे नुकसान होत आहे. सदर तारखेरोजी प्रतिवादी यांनी वादी यांना धमकावुन सदर पाईपलाईनचे पाणी वापरण्यास हरकत, अडथळा केलेला आहे. म्हणुन प्रस्तुतचा अर्ज.

०९. प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी यांचे विरुध्द विना कैफियत/जबाब चाललेला आहे. वादीतर्फे विधीज्ञांनी वर कथन केल्याप्रमाणे त्यांचा युक्तिवाद केला व वादी यांनी अभिलेखावर नि.क्र.३ सोबत महत्वाचा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. त्याची पडताळणी केली असता हे स्पष्ट आहे की, रे.मु.क्र.४३/२००२ मध्ये वर कथन केल्याप्रमाणे वादी व प्रतिवादी मध्ये तडजोड होउन दि.१९.१२.२००७ रोजी नि.क्र.८१ येथील तडजोडीप्रमाणे हुकूमनामा पारीत झालेला होता. वादी यांनी संबंधीत कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती अभीलेखावर वर दाखल केलेल्या आहेत. तसेच, नि.क्र.८१ येथील तडजोडनामा देखील दाखल केलेला आहे. वादींनी वर कथन केल्याप्रमाणे सर्व अटी व शर्ती सदर तडजोडनाम्यात दिसुन येतात. त्यामुळे निश्चितच सदर तडजोडनामाप्रमाणे प्रतिवादी वागणे बांधील आहेत व ते न्यायालयासमोर कैफियत न देता गैरहजर आहेत ही बाब हे दर्शविते की ते वादी कथन केल्याप्रमाणे हरकत, अडथळा करत आहेत. त्यामुळे निश्चितच सदर पाईपलाईनचे पाणी वादी यांचे पिकास प्राप्त न झाल्यास वादी यांचे अपरिमित असे नुकसान होउ शकते. वादी यांनी अभीलेखावर सदरचा अर्ज मंजुर करण्याइतपत आवश्यक तो सकृतदर्शनी पुरावा दाखल केलेला आहे. सबब, वादी यांना सकृतदर्शनी खटला आहे. न्यायाचा तराजु वादी यांचे बाजुने झुकतो. तथापि, प्रतिवादी क्र.३ वसंत यांनी कोणत्याही कारणासाठी पाईपलाईनचा वापर करु नये याबाबतचा मनाई आदेश पारीत करणे न्यायोचीत होणार

नाही. सबब, सदरचा अर्ज अंशतः मंजुर करणे योग्य वाटते. त्यामुळे, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर अंशतः होकारार्थी देत असून मुद्दा क्र. ४ साठी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**:: आ दे श ::**

१. निशाणी क्र.५ वरील अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी अथवा त्यांच्या तर्फे कोणीही इसमाने वादी यांची दावा मिळकतीवरील असलेली शांततामय कब्जेवहिवाटीस तसेच दावा मिळकत गट क्र.३०० मध्ये चोरदडी धरणावरुन आणलेल्या पाईपलाईनचा वापर करण्यास कोणत्याही प्रकारे हरकत, अडथळा करु नये व सदर चोरदडी धरणावरुन आणलेल्या पाईपलाईनचा वापर रे.मु.क्र.४३/२००२ मधील नि.क्र.८२ चे हुकूमनामाप्रमाणेच करावा अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी यांना दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो देण्यात येत आहे.

३. खर्चाबाबत आदेश अंतिम निर्णयाप्रमाणे राहील.

SUNIL BHIMRAO MANE

Digitally signed by SUNIL BHIMRAO MANE
Date: 2024.03.15 16:34:23 +0530

ठिकाण :– चांदवड.
दिनांक :– १५.०३.२०२४.

**(सुनिल भि. माने)**
सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),
चांदवड.